निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

[illegible]

अंक – २०८ वा

बुधवार दि.०१ ऑक्टोबर २०२५

E-mail: dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd. No. [illegible] | RNI.No.MAH/MAR2011/39247


## पूरग्रस्तांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे-मुख्यमंत्री फडणवीस

### टंचाई निवारण काळाप्रमाणेच सर्व सवलती मिळणार, आपत्तीग्रस्तांकडून वसुली नको; बँकाना मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**

**मुंबई** –राज्य शासन पूरग्रस्ताच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. शेतकरी, आपत्तीग्रस्त नागरिकांना टंचाई निवारण काळाप्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाची वसुली थांबवावी, असे निर्देश बँकाना दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकरी वर्ग सध्या अडचणीत आहे. हे लक्षात घेऊन बँकांना वसुली थांबवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पूरग्रस्त कुटुंबांना गहू-तांदूळ, डाळी व आवश्यक वस्तूंचा संच वितरित करण्यात येत आहे. विहीर खचणे, शेतजमीन खरडून जाणे, यावर केंद्र सरकारच्या निकषाबाहेर जाऊन, झालेल्या नुकसानीवरही राज्य शासन स्वतंत्र मदत करणार आहे. नुकसानीचे पंचनामे येत्या दोन-तीन



दिवसांत पूर्ण होऊन पुढील आठवड्यात केंद्र सरकारला प्रस्ताव पाठविला जाणार आहे. मात्र, केंद्र सरकारच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाच्या स्वतःच्या निधीतून मदत सुरू केली आहे. केंद्राकडून ती रक्कम 'रिइम्बर्समेंट'च्या स्वरूपात मिळेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असली तरी आपत्ती व्यवस्थापन नियमावलीत अशी व्याख्येचा समावेश नाही. असे असले तरी टंचाई निवारण काळातील निकषांप्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी आणि जनतेला तातडीने नुकसानभरपाई देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत, त्याप्रमाणे विभागाने गतीने कार्यवाही सुरु केली आहे, असे मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंघल यांनी सांगितले. पुढील तीन ते चार दिवसात नुकसानग्रस्तांच्या खात्यावर भरपाई जमा करण्यावर विभागाचा भर आहे, असेही प्रधान सचिव सिंघल यांनी सांगितले.

## पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी दुष्काळाच्या निकषाप्रमाणे मदत करणार-कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**

**मुंबई** – मे, जून, जुलै ते सप्टेंबर या कालावधीत राज्यातील ३३ जिल्ह्यांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना आतापर्यंत २,२५०/– कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. सप्टेंबर महिन्यातील शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांना दुष्काळग्रस्तांना देण्यात येणाऱ्या सर्व सवलती लागू केल्या जाणार आहेत. कृषी विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा ६ कोटी १७ लाख ५० हजार रुपये हा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचा निर्णय घेतला असल्याचे मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.कृषीमंत्री भरणे म्हणाले की, मंत्रीमंडळ बैठकीत पूरग्रस्त शेतकऱ्यांना दुष्काळग्रस्तांसाठी देण्यात येणाऱ्या सवलती लागू करण्याबाबत चर्चा करण्यात आली. ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात एकूण १ कोटी लाख एकर क्षेत्र बाधित झाले आहे. शासनातर्फे शेतकऱ्यांना २२५० कोटी रूपयांची मदत करण्यात आली आहे. शेतकरी या संकटातून पुन्हा कसा उभा राहील, यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. मंत्रिमंडळातील सदस्यांनी पूरग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांची परिस्थिती जाणून घेऊन संवेदनशीलपणे मदत तातडीने देण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पूरग्रस्त शेतकऱ्यांना पाच ते दहा हजार रुपयापर्यंत सानुग्रह अनुदान, जनावरांना चारा उपलब्ध करून देत आहोत. दहा किलो तांदूळ, गहू आणि तीन किलो डाळ उपलब्ध करून दिली आहे. निसर्गिक संकटाला सामोरे जाण्यासाठी शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील पूर परिस्थितीची माहिती प्रधानमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्र्यांना दिली आहे. केंद्रामार्फतही शेतकऱ्यांना चांगली भरपाई देण्यात येईल. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी शासन सकारात्मक आहे. हे सरकार शेतकऱ्यांचे हित साधणारे असल्याने त्यांना जास्तीत जास्त मदत केली जाईल एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाहीही यावेळी कृषीमंत्री भरणे यांनी दिली.

## दिवाळीपूर्वीच महामंडळाकडून एसटी भाडेवाढीचा निर्णय

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**

**मुंबई** – राज्य परिवहन महामंडळ म्हणजेच सर्वसामान्यांच्या लाल परीची पुन्हा एकदा भाडेवाढ होणार असल्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे दिवाळीपूर्वीच प्रवाशांच्या खिशाला झळ बसणार असून एसटी महामंडळाची भाडेवाढ यंदाही निश्चित करण्यात आल्याचे समजते. एसटी महामंडळाकडून 'दिवाळी'साठी १० टक्के भाडेवाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरपर्यंत ही भाडेवाढ लागू असणार आहे. दिवाळी सणासाठी एसटी बसने प्रवास करणाऱ्यांची संख्या लाखोंच्या घरात आहे. सध्या चारचाकी खासगी वाहने वाढली असली तरीही एसटीचा प्रवास सुरक्षित प्रवास मानला जातो. मात्र, आता एसटीचा प्रवास महागडा प्रवास होणार आहे. राज्य परिवहन महामंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, वातानुकूलित शिवनेरी आणि शिवाई बसेस सोडता सर्वच बसेससाठी १० टक्के दरवाढ लागू करण्यात येत आहे. त्यामुळे, गावखेड्यापासून ते रातराणीने लांब पल्ल्याच्या गाड्यांनी प्रवास करणाऱ्या सर्वच प्रवाशांना या भाडेवाढीचा फटका बसणार आहे. आधीच राज्यातील बळीराजा अतिवृष्टीने खचून गेलेला असताना, आता दिवाळीपूर्वीच सार्वजनिक वाहतूक प्रवासाच फटका सर्वसामान्यांना बसणार आहे. या नव्या भाडेवाढ निर्णयानुसार, जिथं १०० रुपये भाडे (तिकीट) होते, तिथं आता ११० रुपये दर आकारले जाऊ शकतात.

## कर्करोग उपचारासाठी सर्वसमावेशक धोरण, राज्य मंत्रीमंडळचा निर्णय

### महाकेअर फाऊंडेशनची स्थापना, त्रिस्तरीय रचनेतून राज्यभरातील १८ रुग्णालयांमध्ये मिळणार दर्जेदार उपचार

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**

**मुंबई** – राज्यातील कर्करोगग्रस्तांना दर्जेदार उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी सर्वसमावेशक कर्करोग सेवा धोरण निश्चित करण्यात आले. यासाठी महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन (महाकेअर फाऊंडेशन) कंपनी स्थापन करण्यास तसेच या माध्यमातून राज्यभरातील १८ रुग्णालयांतून कर्करोगाशी निगडीत विशेषोपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यामुळे राज्यात कर्करोगाशी संबंधित डे-केअर केंद्रांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे.

या धोरणानुसार कर्करोग रुग्णालयांची एल-१, एल- २, आणि एल ३ अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली आहे. या केंद्राच्या माध्यमातून रेडिओथेरपी, केमोथेरपी तसेच पदव्युत्तर व अतिविशेषोपचार शिक्षण, सर्व प्रकारच्या कर्करोगांचे निदान, शस्त्रक्रिया, भौतिकोपचार, मानसिक आधार व उपचार, संशोधन यासह पॅलेटिव्ह उपचार, औषध सुविधा यांची उपलब्धता तसेच जनजागृतीचे उपक्रम राबविले जाणार आहेत.

यात टाटा स्मारक रुग्णालय ही संस्था एल १ स्तरावरील शिखर संस्था म्हणून निश्चित करण्यात आली आहे. तर छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, सर ज. जी. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मुंबई (जे. जे.), छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय कोल्हापूर, बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे, येथील ६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रूग्णालये तसेच नाशिक व अमरावती येथील सार्वजनिक आरोग्य विभागाची दोन संदर्भ सेवा रुग्णालये अशी एकूण आठ केंद्र ही एल २ केंद्र म्हणून निश्चित करण्यात आली आहेत. तर अंबाजोगाई (बीड), नांदेड, यवतमाळ, मुंबई (कामा व आल्ब्लेस रुग्णालय), सातारा, बारामती, जळगांव व रत्नागिरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्नित ८ रूग्णालये व शिर्डी संस्थानचे रुग्णालय अशी एकूण नऊ रुग्णालये एल ३ स्तर केंद्र म्हणून निश्चित करण्यात आली आहेत.

महाकेअर फाऊंडेशनला भागभांडवल म्हणून सुरुवातीला शंभर कोटी इतका निधी म्हणून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत कर्करोग रुग्णालयांना मिळणाऱ्या शुल्कापैकी २० टक्के शुल्क महाकेअर फाऊंडेशनला देण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. याशिवाय फाऊंडेशन क्लिनिकल ट्रायल्समधून निधीची उभारणी करणार आहे. तसेच या फाऊंडेशनला आवश्यकतेनुसार आंतरराष्ट्रीय संस्थांमार्फत देणग्या, अनुदाने, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत निधी उभारता येणार आहे. यामुळे फाऊंडेशनला कर्करोगाव्यतिरिक्त वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागांतर्गत इतर प्रकल्पांसाठी देखील निधी उभा करता येणार आहे.

शहरी आणि ग्रामीण भागात सर्वसमावेशक विकास करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि प्रशासकीय गतिमानतेवर भर देणारे महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र धोरण २०२५ राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आले. या धोरणामुळे राज्यात ५० हजार ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक व त्यातून सुमारे चार लाख रोजगार निर्मिती होईल, असे अपेक्षित आहे. या धोरणाचा कालावधी २०२५ ते २०३० असा राहणार आहे.राज्याच्या विकासाला आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड जेऊन एकात्मिक आणि नियोजनबद्ध गती देण्यासाठी महाजिओटेक महामंडळ स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या महामंडळाची कंपनी कायद्यांतर्गत स्थापना करण्यात येणार असून यासाठी १०६ पदांच्या निर्मितीसही मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लीकेशन सेंटर अर्थात महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्राचे अस्तित्व कायम ठेवून हे महामंडळ स्थापन करण्यात येणार आहे.

## तातडीने ओला दुष्काळ, सरसकट कर्जमाफी जाहीर करा; सुप्रिया सुळेंची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**

**मुंबई** – राज्यात आलेल्या पूर परिस्थितीवर काय उपाययोजना करावा या संदर्भातील सविस्तर दोन पत्र आदरणीय पवार साहेबांनी राज्य सरकारला दिलेले असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. या पत्रामध्ये काय उपाययोजना तातडीने कराव्या तसेच काही सूचना देखील आदरणीय पवार साहेब यांनी केले आहे.

मी दोन महिन्यांपूर्वी खरंतर मी केंद्रीय मंत्री अमित शहा यांना भेटून सांगितले होते की ओला दुष्काळ जाहीर करा. आणि सरसकट कर्जमाफी करा पण आता तीव्रता आणि अतिवृष्टी एवढी वाढलेली आहे की आता दोन भागात काम करावे लागणार आहे. एक तर ओला दुष्काळ जाहीर झालाच पाहिजे. त्याचबरोबर सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजेत. ही एक बाजू तर दुसरी बाजू रिहॅबिलिटेशन बाबत देखील काम करावे लागेल. असे सुप्रिया सुळे बोलताना म्हणाल्या.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, पुरामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून, ही नियम आणि निकष लावायची वेळ नसून माणुसकी दाखवायची वेळ आहे. मला कळत नाही की सरकार एवढं हात राखून का वागत आहे. संकटात सापडलेल्या पूराग्रस्तांना तातडीने मदत झालीच पाहिजे. तसेच सरसकट कर्जमाफी आणि तातडीने ओला दुष्काळ जाहीर झाला पाहिजे.

आता लोकांना उभं करणं गरजेचे आहे. शाळा , महाविद्यालये उभं करणं. लोकांना मदत करावी लागेल. आधी ओला दुष्काळ जाहीर करा. मुलींना वह्या पुस्तके द्या. डीबीटीची सोय आहे. जिथे परिणाम नाही तिथली यंत्रणा आपदग्रस्त भागात काम करण्याकरिता पाठवता येईल का हे देखील सरकारने करावे. ही कायदे नियम लावण्याची वेळ नाहीए. सरकार हातरोखून मदत का करतेय. सरसकट कर्जमाफी आणि ओला दुष्काळ जाहीर झालाच पाहीजे. असेही सुप्रिया सुळे यांनी बोलताना स्पष्ट केले आहे.

## कर्जमाफी ते एकरी ५० हजार द्या; जयंत पाटलांची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**

**मुंबई** – पूरग्रस्तांना मदत देण्यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारच्या मदतीची वाट न पाहता केंद्रातील सरकार आता आपलेच आहे, या भावनेने आता राज्याची तिजोरी रिकामी केली पाहिजे. केंद्र सरकारची मदत येईल तेव्हा येईल असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी व्यक्त केले. एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे मदत अशी कृपा करू नये. एनडीआरएफचे निकष आता जुने झाले असून महागाई वाढली आहे. संकटही तितकेच मोठे आहे. त्यामुळं सरकारने पूरग्रस्तांना भरीव अशी मदत द्यावी, असे मत जयंत पाटील यांनी व्यक्त केले.

पूरग्रस्तांसाठी दिलेले ५ हजार रुपये फार कमी आहेत. १० ते १५ हजार रुपये देणे गरजेचे होते, सरकारने तातडीने ती मदत द्यावी असे मत जयंत पाटीलयांनी व्यक्त केले. एका एकर साठी ५० हजार रुपये मदत द्यावी असेही जयंत पाटील म्हणाले. कर्जमाफी देण्याची ही योग्य वेळ आहे. मराठवाड्यात अनेकांनी आत्महत्या केली आहे त्यामुळे आता कर्जमाफी द्यावी असे पाटील म्हणाले. केंद्राकडून मदत येईल याची वाट न पाहता राज्य सरकारने आता आपली तिजोरी रिकामी करावी असेही ते म्हणाले.

## ज्यांनी बदनामी केली तेच महात्मा गांधींच्या शरण गेले-हर्षवर्धन सपकाळ

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**

**नागपूर** – काँग्रेस पक्षातर्फे संविधान सत्याग्रह पदयात्रा काढण्यात आली आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी बोलताना पुन्हा एकदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार टीका केली आहे. द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत कोणी मांडला हे सर्वांना माहीत आहे, पण बदनामी मात्र महात्मा गांधींची करण्यात आली. परंतु, आज तोच संघ महात्मा गांधी यांना शरण गेला. हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वैचारिक पराभव असल्याचा खोचक टोला हर्षवर्धन सपकाळ यांनी लगावला आहे.



हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, खोटे बोलून आज भाजपा सत्तेत आला आहे. पण महात्मा गांधी नावाचा संत भाजपा व संघाच्या मानगुटीवर बसलेला आहे. संघाच्या १०० व्या वर्षी सुवर्णयोग आलेला असून भारताचे संविधान व महात्मा गांधी यांचे विचार संघाने स्विकारावे असे आवाहन काँग्रेसने केले आहे. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून अद्याप उत्तर मिळालेले नाही. कारण त्यांच्या पायाखालची वाळू सरकलेली आहे.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी आशिया चषकानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या ट्विटर टीका केली आहे. ते म्हणाले, भारत पाकिस्तान आशिया चषक भारताने पहिल्यांदाच जिंकलेला नाही. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मात्र यातही राजकारण करण्याची संधी सोडली नाही. हवा असो, पाणी असो किंवा खेळ असो नरेंद्र मोदी ध्रुवीकरण करण्यासाठी प्रत्येक गोष्टीत राजकारण आणतात हे त्यांच्या एक्सवरील पोस्टवरून स्पष्ट होते. भारतीय संघाने दणदणीत विजय मिळवला याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, पण देशाची एक विशिष्ट प्रतिष्ठा असते ती मात्र नरेंद्र मोदी जपत नाहीत, अशी खंत देखील सपकाळ यांनी व्यक्त केली.

## अहिल्यानगर दंगल सरकार पुरस्कृत; विजय वडेट्टीवार यांचा आरोप

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**




**मुंबई** – अहिल्यानगर येथील दंगल सरकार पुरस्कृत होती. शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवरून लक्ष हटवण्यासाठी ही दंगल घडवण्यात आली, असा आरोप काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मंगळवारी केला. त्यांच्या या आरोपामुळे या प्रकरणी वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अहिल्यानगर येथे सोमवारी आय लव्ह मोहम्मद असा उल्लेख असणारी रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीवरून दुर्गामाता दौडीचे आयोजन करण्यात आले होते. या मुद्यावरून शहरात मोठा तणाव निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी उपरोक्त आरोप केला आहे. ते म्हणाले, राज्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी रडत आहे. लोकांची घरे गेली आहेत. अन्नधान्य, कपडे, पीकपाणी वाहून गेले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात मोठे नुकसान झाले आहे. पण वादग्रस्त रांगोळी काढून दोन समाजात वाद निर्माण केला जात आहे. जनतेच्या प्रश्नांवर लक्ष हटवण्यासाठी या गोष्टी मुद्दाम घडवून आणल्या जात आहेत.

## राज्यात लगेच पंचनामे होतील अशी स्थिती नाही; गिरीश महाजन यांची माहिती

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**

**मुंबई** –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानीचा आढावा घेऊन भरपाई देण्याची ग्वाही दिली आहे. पण राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी राज्यात लगेच पंचनामे होतील अशी स्थिती नसल्याचे स्पष्ट केले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांतील शेतातील पुराचे पाणी अद्याप हटले नाही. त्यामुळे तिथे लगेच पंचनामे होतील अशी स्थिती नाही, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे पीडित शेतकऱ्यांना तातडीने मिळणाऱ्या नुकसानभरपाईवर सवाल उपस्थित होत आहे.



राज्य मंत्रिमंडळाची आज बैठक आहे. या बैठकीपूर्वी पत्रकारांशी संवाद साधताना गिरीश महाजन म्हणाले, राज्यात अनेक ठिकाणी अद्यापही पाणी आहे. शेतातही पाणी आहे. त्यामुळे आता लगेच पंचनामे होतील अशी स्थिती नाही. जिल्हाधिकारी, तहसीलदार, तलाठी, पोलिस व कृषि विभाग या प्रकरणी २४ तास काम करत होते. हे अधिकारी रात्रंदिवस रस्त्यावर होते. पण आजपासून थोडे विश्रांती मिळाली आहे. तरीही ते सकाळपासूनच कामाला लागले आहे. पंचनामे झाल्याशिवाय नुकसानीचा आढावा घेता येत नाही. नेमका आकडा कळत नाही. पण निश्चित आत्ता हे आकडे येतील. त्यानंतर किती नुकसान झालंय, किती शेतकऱ्यांना द्यायचे आहे. तो आकडा पाहून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री केंद्राकडे राज्याचा मदतीचा प्रस्ताव पाठवतील.

## ऑक्टोबर महिन्यात पाऊस आणखी झोडपणार

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**

**पुणे** – सप्टेंबर महिन्यात सुरू झालेल्या परतीच्या पावसामुळे देशातील अनेक भागात मोठ्या प्रमाणात पूरस्थिती निर्माण झाली होती. महाराष्ट्रातील मराठवाड्यासह इतर ठिकाणी मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पुरस्थितीमुळे पिकांसह मालमत्तेचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. ऑक्टोबर महिन्यात संपूर्ण भारतात मुसळधार पाऊस पडू शकतो, असा अंदाज हवामान खात्याने दिला आहे.

आयएमडीचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले की, ऑक्टोबर महिन्यात सरासरीपेक्षा ११५ टक्के अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. एवढंच नाही तर या पावसामुळे गेल्या ५० वर्षांतील रेकॉर्ड तुटू शकतो. सर्वसाधारणपणे ऑक्टोबर महिन्यात एवढा पाऊस पडत नाही.

## जयंतराव, सांग तुझ्या कितव्या बायकोचं मंगळसूत्र मी चोरलंय; गोपीचंद पडळकर पुन्हा बरळले

**आत्ताच एक्सप्रेस ब्युरो**

**मुंबई** – गेल्या काही दिवसापासून भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांच्यात चांगलाच कलगीतुरा रंगल्याचं चित्र पाहायला मिळतच आहे. गोपीचंद पडळकर हे सातत्याने जयंत पाटील यांच्या खालच्या शब्दात टीका करत आहेत. आज पुन्हा पडळकरांनी जयंत पाटील यांच्यावर जहरी टीका केली आहे. मला मंगळसूत्र चोर म्हणतात, जयंत पाटील यांनी सांगावं त्याच्या कितव्या बायकोचे मी मंगळसूत्र चोरले अशा शब्दात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी टीका केली आहे.

गोपीचंद पडळकर यांनी त्यांच्यावर टीका केलेल्या विरोधकांना शायरीतून उत्तर दिले आहे. बडी सी बडी हस्तीं मीट गई मुझे मींटाने मे! तेरी उम्र जायेगी मुझे मिटाने मे असे म्हणत गोपीचंद पडळकर यांनी विरोधकांवर निशाणा साधला. जयंत पाटील यांच्यावर देखील जहरी टीका पडळकरांनी केली आहे. मला मंगळसूत्र चोर म्हणतात, जयंत पाटील यांनी सांगावं त्याच्या कितव्या बायकोचे मी मंगळसूत्र चोरले. मंगळसूत्र चोरीच्या आरोपावरून गोपीचंद पडळकर यांची पुन्हा एकदा जयंत पाटील यांच्यावर टीका केली आहे.

## संपादकीय

# राम (लीला) रंगी रंगले दिल्लीकर!

गेली काही वर्षे कोट्यवधी रुपयांचे बजेट असलेल्या रामलीला एकीकडे आणि अगदी काही हजारांत सादर होणाऱ्या रामलीला दुसरीकडे असेही चित्र दिसते. संरक्षित वारसा यादीतील पौडी गढ़वालच्या ऐतिहासिक रामलीलेपासून दिल्लीच्या मातीतल्या पारंपरिक रामलीला पाहण्यासाठी लाखोंची गर्दी उसळते. दिल्लीत फिरायला येण्याचा प्लॅन करत असाल तर मुलांच्या सुट्या, गोंधळानेच गाजणारी संसद अधिवेशनं वगैरे बाजूला ठेवून नवरात्रात खास रामलीला पाहायला नक्की या. नवरात्राच्या पहिल्या दिवशीपासून दसऱ्यापर्यंतचे १० दिवस दिल्लीत रामलीलांनी रंगतात. दसऱ्याला प्रतीकात्मक रावण दहनाने हा सोहळा संपतो; तेव्हा थंडीबरोबरच दिवाळीची चाहूल लागलेल्या बाजारपेठा झगमगलेल्या असतात. शतकानुशतकाचा इतिहास अंगाखांद्यावर मिरवणाऱ्या या रामलीलांमध्ये समकालीन विषयही मोठ्या खुबीने डोकावतात. पाकिस्तानला नुकताच दणका देणारे ऑपरेशन सिंदूर यंदा एका प्रसिद्ध रामलीलेत झळकणार आहे! अलीकडे दिल्लीत गरबा-दांडिया संस्कृतीही वाढत आहे. मयूर विहार, प्रीतमपुरा सारख्या भागांत गरबा रंगतो, पण त्यात 'जस्ट एन्जॉय'ची भावना आणि डीजेचा दणदणाट जास्त असतो. दुर्गापूजा हा तर स्वतंत्र लेखाचा विषय! कालौघात रामलीलेतही सामाजिक अपप्रवृत्तींचा करोना शिरलेला असला तरी 'खळांची व्यंकटी सांडो' ही आशा अमर राहते; तेच समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. या नव-रात्री म्हणजे जगप्रसिद्ध रामलीला मैदानापासून ठिकठिकाणच्या जत्रा-यात्रा म्हणजे फक्त बच्चेकंपनी नव्हे तर खवय्या दिल्लीकरांसाठीही पर्वणी असते. दिल्लीत शेकडो रामलीला समित्या आहेत; त्या साऱ्यांची नोंदही होत नाही. पण रामलीला मैदान, लाल किल्ला (लव कुश रामलीला समिती), दरियागंज, कॅनॉट प्लेस, करोलबाग, झंडेवालान, पटेलनगर, जनकपुरी, विवेक विहारचे डी.डी.ए. ग्राउंड, द्वारकातील नवरात्र रामलीला समिती, दक्षिण दिल्लीत पंचशील पार्क, हौज खास, मालवीयनगर, लाजपतनगर, पूर्व दिल्लीत शहादरा, विनोदनगर, मयूर विहार, लक्ष्मीनगर, गीता कॉलनीसारख्या दिल्लीच्या सर्व भागांत शेकडो रामलीलांचे आयोजन होते. वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक असलेल्या दसऱ्यापूर्वी रंगणाऱ्या या रामलीलांनी वेळोवेळी दिल्लीश्वरांना धडकी भरवल्याचेही दाखले आहेत. गोस्वामी तुलसीदास यांच्या शिष्यांनी दिल्लीत रामलीलांची परंपरा सुरू केल्याचे सांगितले जाते. सतराव्या शतकात औरंगजेबाने रामलीलेवर बंदी घातली होती. त्याच औरंगजेबाचा वारस महंमदशहा रंगीला याने लाला सीताराम यांच्याकडे सरकारी तिजोरीसाठी कर्ज मागितले. त्यांनी त्या बदल्यात त्यांना त्यांच्या सीताराम हवेलीत रामलीला सादर करण्याची अट घातली. अखेरचा मुघल बहादुरशहा जफर यांच्या काळात ही रामलीला नियमित झाली. पुढे सायबाचेही डोके फिरले. ब्रिटिशांनी कोलकत्याहून दिल्लीला संसार हलवल्यावर रामलीलेवर बंदीच आणली नाही, तर रामलीला मैदानाचे रूपांतर लष्कराच्या छावणीत आणि घोड्यांच्या गोठ्यात करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. पण नंतर पं. मदनमोहन मालवीय यांनी असा दवाब आणला की त्यांना रामलीला पुन्हा सुरू करावी लागली. पुढे कवी इक्बाल यांनी रामाचा गौरव करताना म्हटले की- है राम के वजूद पे हिन्दोस्ताँ को नाज़ । अहल-ए-नज़र समझते हैं इस को इमाम-ए-हिंद ।। गेली काही वर्षे कोट्यवधी रुपयांचे बजेट असलेल्या रामलीला एकीकडे आणि अगदी काही हजारांत सादर होणाऱ्या रामलीला दुसरीकडे असेही चित्र दिसते. रावण, कुंभकर्ण आणि मेघनाद यांचे अनुक्रमे १०० फूट, ९० फूट आणि ८० फूट उंचीचे, हरित फटाक्यांनी गच्च भरलेले पुतळे कोणत्या रामलीलेत असणार हे सुद्धा उत्सुकतेचा विषय ठरतो. संरक्षित वारसा यादीतील पौड़ी गढ़वालच्या ऐतिहासिक रामलीलेपासून दिल्लीच्या मातीतल्या पारंपारिक रामलीला पाहण्यासाठी लाखोंची गर्दी उसळते. महाविद्यालयीन व राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे (एनएसडी) विद्यार्थी, काही परदेशी व इतर राज्यांतून खास येणारे कलाकार दिवसाला १२-१५ तास सराव करून रामलीला सादर करतात. अशा वेळी होणाऱ्या विनोदी प्रसंगांचेही भरपूर दाखले मिळतात. राम, सीता, रावण, हनुमान, लक्ष्मण यासारखे कलाकार निवडताना रामलीला समित्या काटेकोरपणे विचार करतात. रामलीलांमधील काही कलाकार अलीकडे दिल्लीच्या 'टाइम्स हाऊस'मध्ये आले होते. रावणाच्या भूमिका साकारणाऱ्या कलाकारांचे अनुभव थक्क करणारे असतात. निशांत शर्मा, नवीन चतुर्वेदी, संजीव कपूर, गजेंद्र सिंह, प्रीतम बिश्त, दिनेश कांडपाल, नृत्यशिक्षक सतीशकुमार आदी एका सुरात रावणाच्या त्या गडगडाटी हास्याचा आविष्कार घडवतात; तेव्हा एकत्र येणाऱ्यांचा थरथराट होतो!अनेक व्रात्य मुलांना रावणाची भीती दाखवण्यासाठी पालक त्यांना स्टेजच्या मागे आमच्याकडे आणतात, असे सांगणाऱ्या गौरवसिंह यांच्या डोळ्यात वेगळी व्यथा दिसते. अनेक कलाकार रावण दहन पाहूही शकत नाहीत, त्या वेळी पाठ फिरवून उभे राहतात. या कलाकारांबरोबर सेल्फी काढण्यासाठी गर्दी होते, तसेच कलाकारही एकमेकांबरोबर सेल्फी घेण्याचा आनंद लुटतात. उत्तर प्रदेशात बिसरख हे रावणाचे गाव मानले जाते. रामलीला निर्विघ्न पार पडल्यावर तिथे जाऊन रावणपूजन करण्याचीही परंपरा अनेक कलाकार पाळतात. भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्यापासून द्रौपदी मुर्मू यांच्यापर्यंत आणि जवाहरलाल नेहरूपासून नरेंद्र मोदी यांच्यापर्यंतच्या पंतप्रधानांनी रामलीलांमध्ये हजेरी लावली आहे. १९९९ च्या निवडणूक प्रचारात 'रोम की राम' या सारखी प्रचारटीका जोरात होती; तेव्हापासून २०२४ पर्यंत काँग्रेसनेत्या सोनिया गांधी नियमितपणे दसऱ्याला रामलीलेत सहभागी होतात. काय विलक्षण आहे ना! तसं पाहिलं तर रामलीलेमध्ये कथावस्तू अशी वेगळी काय असते? श्रावण बाळापासून लव कुश रामाच्या दरबारात येऊन रामकथा सांगतात तिथपर्यंतची, हजारो वर्षांपासून प्रत्येक भारतीयाला माहिती असलेली कथा तरीही ही रामगाथा कधी 'तीच ती' वाटत नाही. किंबहुना गदिमा म्हणतात तसे 'जोवरी हे जग जोवरी भाषण, तोवरी नूतन नित रामायण'; असा महिमा असलेल्या या रामकथेची खुमारी वर्षागणिक वाढतच जाते 'इमाम-ए-हिंद' असे गौरवपूर्ण बिरुद इतके सार्थ ठरते !

# पुणेकरांचा 'सुर्या' बरोबर मैत्रीपूर्ण करार



''स्मार्ट सिटी''चा ध्यास घेतलेल्या पुणे शहराने आता 'ग्रीन सिटी'कडे झेप घेतली आहे. पारंपरिक विजेवरील अवलंबित्व कमी करून पुणेकरांनी सुर्याबरोबर मैत्रीपूर्ण करार करून छतावरच्या सूर्यकिरणांना कैद केलं. त्यातून स्वच्छ, मोफत आणि शाश्वत वीज निर्माण सुरु केलं. आता प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळतो आहे. हजारो घरांच्या छपरांवर उभ्या राहिलेल्या सौरपॅनेल्समुळे केवळ वीजबिल शून्यावर येत नाहीत, तर पर्यावरण संवर्धनाचाही नवा अध्याय लिहिला जातो आहे.

**उन्हाचे सोने विजेचे धन**

''उन्हामुळे छत तापायचं आणि बिलं वाढायची, पण आता त्याच छतावर सूर्या बरोबर मैत्रीपूर्ण करार करून त्याच्या तापण्याला कैद करून मोफत वीज तयार होतेय!'' हा अनुभव आहे पुणेकरांचा.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेमुळे पुण्यातील तब्बल १८,६९४ घरांनी आपल्या छतावर सौर पॅनेल्स उभारले आहेत. त्यातून तब्बल ९०.६२ मेगावॅट वीज निर्मिती होत असून १५१ कोटी रुपयांचे अनुदान पुणेकरांना मिळाले आहे.

**विजेपासून स्वयंपूर्णतेकडे वाटचाल**

या योजनेमुळे अनेक घरांचे मासिक बिल शून्यावर आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या या योजनेतून देशभरात ५,८८९ मेगावॅट क्षमता तर महाराष्ट्रात ११०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प उभारले गेले आहेत. पुण्यातही हा बदल झपाट्याने दिसतो आहे.

**पुणे परिमंडलातील प्रगती**

३१,६४९ नोंदणी, त्यापैकी १८,६९४ प्रकल्प कार्यान्वित, ७३९७ प्रकल्प अंतिम टप्प्यात

**मंडलनिहाय क्षमता**

गणेशखिंड : ७३१२ प्रकल्प, ३८.२१ मेगावॅट

पुणे ग्रामीण : ५१४६ प्रकल्प, २१.०७ मेगावॅट

रास्तापेठ : ६२३६ प्रकल्प, ३१.३४ मेगावॅट

**अनुदान वितरण**

गणेशखिंड : ६२.४ कोटी,पुणे ग्रामीण : ३६.४ कोटी,रास्तापेठ : ५२.५८ कोटी.

**पर्यावरणीय महत्त्व**

स्वच्छ हवा, हरित पुणे

९०.६२ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प दरवर्षी जवळपास १.३ कोटी युनीट वीज तयार करतील. यामुळे दरवर्षी सुमारे ७०-७५ हजार टन कार्बन उत्सर्जन टळेल, जे ३.५ लाख झाडं लावल्यासारखं आहे.

म्हणजेच दरवर्षी पुणेकरांच्या श्वासातली हवा अधिक स्वच्छ होणार आहे.

वाढता एअर कंडिशनिंग वापर आणि औद्योगिक वसाहतींचा ताण कमी करण्यासाठी ही सौर ऊर्जा पुणेकरांना दिलासा देते आहे.

**''सूर्य आला घराघरात''**

समजा एक कुटुंब दर महिन्याला २५० युनिट वीज वापरत होतं. ३ किलोवॅटचा प्रकल्प बसवल्यानंतर त्यांचे बिल आता शून्यावर येऊन जादा तयार झालेली वीज ग्रिडला विकून त्यांना उत्पन्नही मिळवता येऊ शकतं. वीज बिलाचा ताण जातो आणि मुलांनाही हरित वीज कशी पर्यावरणाला पूरक आहे याचा धडा मिळतो.

याचबरोबर एका गृहसंस्थेने ५० किलोवॅट प्रकल्प बसवून संपूर्ण सोसायटीच्या कॉमन एरिया लाइटिंगची बिलं शून्य करता येऊ शकतात. यामुळे नागरिकांमध्ये सौर ऊर्जेबद्दल प्रचंड आत्मविश्वास वाढला आहे.

**योजनेची वैशिष्ट्ये**

पहिल्या २ किलोवॅटपर्यंत प्रतिकिलोवॅट ३०,००० अनुदान, ३ किलोवॅटसाठी ७८,००० अनुदान, गृहसंस्थांसाठी ५०० किलोवॅटपर्यंत प्रति किलोवॅट १८,००० अनुदान, 'जनसमर्थ पोर्टल'वरून ९०% कर्जाची सोय गृहकर्जापेक्षाही कमी व्याजदरात महावितरणकडून ऑनलाईन प्रक्रिया, अनुदान वेळेत, वीजमीटर मोफत.

**पुणेकरांना आवाहन**

''पुणेकर सूर्यघर योजनेचे महत्त्व जाणतात. अधिकाधिक नागरिकांनी यात सामील व्हावे. वीज बिल वाचवून, पर्यावरण वाचवून आपण भविष्यातील पिढ्यांसाठी देणगी ठेवूया.'', असे आवाहन महावितरण पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी केले आहे.

**हरित क्रांतीची सुरुवात**

पुणेकरांनी सूर्याला खरंच आपल्या घराशी जवळ आणलं आहे. आर्थिक बचत, पर्यावरण संवर्धन आणि ऊर्जा स्वावलंबन या तिन्ही पातळ्यांवर त्यांनी अनुकरणीय आदर्श घालून दिला आहे. हा प्रवास फक्त विजेचा नाही, तर हरित पुण्याकडे नेणाऱ्या नव्या क्रांतीचा आहे. चला हरित पुणे करूया आणि पुण्याची वाटचाल स्मार्ट पुण्याकडे करूया!!

**- युवराज पाटील**
जिल्हा माहिती अधिकारी,
पुणे

# सही करण्याअगोदर खात्री करा; नंतर नाती आणि व्यवहार एक कागद स्पष्ट करतो

आजच्या समाजात प्रत्येकजण नात्यांमध्ये, व्यवहारांमध्ये किंवा व्यावसायिक करारांमध्ये कागदोपत्री प्रक्रिया स्वीकारतो. परंतु दुर्दैवाने बहुतेक लोक सही करण्याअगोदर त्या दस्तऐवजाचा नीट अभ्यास करत नाहीत. अनेक वेळा आपण भावनेच्या भरात, नात्यांवर विश्वास ठेवून किंवा तातडीच्या गरजेत कोणत्याही कागदावर सही करतो. नंतर जेव्हा वाद, गैरसमज, आर्थिक नुकसान किंवा कौटुंबिक मतभेद निर्माण होतात तेव्हा तोच कागद आपल्याला अडकवतो.

हायकोर्टमध्ये सर्रास दिसणारे प्रकरण म्हणजे लोकांनी वाचून न पाहिलेल्या दस्तऐवजावर केलेली सही. एखादा करार, विक्रीपत्र, तडजोड करार, कर्जाचे कागदपत्र किंवा अगदी नातेवाईकांत झालेला जमीनवाटपाचा करार हे सारे कागद कायद्याच्या दृष्टीने साक्षीदार ठरतात. न्यायालय नेहमी दस्तऐवजालाच प्राथमिकता देते. कारण कागदावरची सही म्हणजे आपली संमती आणि मान्यता.

**सहीपूर्वीची खबरदारी :**

दस्तऐवज वाचल्याशिवाय सही करू नका : अगदी लहानशा करारातसुद्धा लपविलेले अटी असू शकतात. कायद्याचा सल्ला घ्या. ॲडव्होकेटच्या मार्गदर्शनाखाली कागद समजून घ्या. कायद्याची भाषा सामान्य व्यक्तीस गुंतागुंतीची वाटते, परंतु तिचे योग्य स्पष्टीकरण तज्ज्ञच देऊ शकतो. साक्षीदारांचा विचार करा. कधी कधी साक्षीदार केवळ औपचारिकतेसाठी घेतले जातात, पण त्यांचे महत्त्व नंतर वादात प्रकर्षाने समोर येते. विश्वासावर सही करू नका. नातेवाईक, जवळचे मित्र किंवा व्यावसायिक भागीदार यांच्याबरोबरही व्यवहार लिहिताना शंका न घेता पारदर्शकता ठेवावी. भाषा समजली नाही तर विचारणा करा. कागद कोणत्याही भाषेत असो मराठी, इंग्रजी किंवा हिंदी तुम्हाला तो समजला नाही तर सही टाळावी.

**कायद्याचा दृष्टिकोन**

भारतीय करार अधिनियम, नोंदणी अधिनियम, व भारतीय पुरावा अधिनियम हे दस्तऐवजांबाबत स्पष्ट दिशा देतात. कोणत्याही करारावर सही केल्यास तो वैध मानला जातो, जोपर्यंत तो दबावाखाली, फसवणूक करून किंवा भ्रम निर्माण करून घेतलेला नाही हे सिद्ध होत नाही. पण हे सिद्ध करण्याची जबाबदारी सही करणाऱ्यावरच येते. नातेसंबंधातील विश्वासामुळे अनेकदा लोक फसतात. ''आपल्या माणसाने कधी फसवेल?'' या भावनेतून केलेली सही नंतर घराची, जमिनीची किंवा व्यवसायाची हानी करून जाते. न्यायालयात अशा प्रकरणांत ''कागद बोलतो आणि भावना गप्प बसतात'' असे चित्र असते. जगातील प्रत्येक नातं, व्यवहार किंवा करार शेवटी एका कागदावर स्पष्ट होतं.

आई-वडिलांची वसीयत, भावंडांतली वाटणी, व्यावसायिक भागीदारी किंवा अगदी कर्ज व्यवहार सर्वकाही कागदावर ठरते. आणि तो कागद नातेसंबंधातील चांगुलपणा जपतो की तोडतो हे सही करण्याआधी घेतलेल्या काळजीवर अवलंबून असते.

सावधानता हीच सुरक्षा : हायकोर्ट ॲडव्होकेट म्हणून माझा अनुभव सांगतो की, प्रकरण न्यायालयात आल्यानंतर लोक म्हणतात ''आम्ही विश्वास ठेवला म्हणून सही केली, पण वाचलं नाही.'' त्या वेळी पश्चात्ताप करून काहीही साध्य होत नाही. म्हणून प्रत्येकाला माझा ठाम संदेश आहे : सही करण्याआधी नीट वाचा, समजून घ्या आणि मगच निर्णय घ्या. कायदा समजून घेणे हे तुमचा हक्क आहे, तो वापरा. नाती जपायची असतील तर व्यवहार पारदर्शक ठेवा. आजच्या युगात विश्वासाला महत्त्व आहेच, पण कायदेशीर सुरक्षिततेला त्याहून अधिक महत्त्व आहे. सही करण्याआधी घेतलेली थोडीशी खबरदारी भविष्यातील मोठ्या संकटापासून वाचवते. लक्षात ठेवा ''नंतर नाती आणि व्यवहार एक कागद स्पष्ट करतो; म्हणून सही करण्याअगोदर खात्री करा.''

**- शंकर चव्हाण,**
ॲडव्होकेट, हायकोर्ट
मुंबई
***

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार... महिलांना आरोग्य साक्षरतेकडे नेणारा मार्ग

केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय आणि महिला व बाल विकास मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर २०२५ (पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त) ते २ ऑक्टोबर २०२५ (गांधी जयंती) या कालावधीत 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे अभियान राबविले जात आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश महिलांचे आरोग्य, पोषण आणि कुटुंब कल्याणाला बळकटी देणे आहे. जिल्हा आणि महानगरपालिका स्तरावर आयुष्मान आरोग्य मंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे आणि अंगणवाड्यांमध्ये विशेष आरोग्य शिबिरे आयोजित केली जात आहेत. या ठिकाणी महिलांसाठी मोफत तपासणी, लसीकरण आणि समुपदेशन उपलब्ध आहे. यातून महिलांना आरोग्य साक्षर करण्याचा प्रयत्न यशस्वी होताना दिसत आहे.

शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये लाखो महिलांना मोफत आरोग्य सेवा पुरवल्या जात आहेत. या अभियानात सहभागी होण्यासाठी नागरिक आरोग्य शिबिरांना भेट देऊ शकतात, जिथे आयुष्मान आरोग्य मंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि अंगणवाड्यांमध्ये विशेष तपासण्या, लसीकरण आणि समुपदेशन उपलब्ध आहे. महिलांना स्थानिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधून या शिबिरांची माहिती मिळवता येईल. आरोग्य विभाग जनजागृती मोहिमेद्वारे कुटुंबातील महिलांना प्रोत्साहन देत आहे. राष्ट्रीय पोषण महिन्यात पोषण, मासिक पाळी स्वच्छता आणि कुटुंब नियोजनावर व्याख्यानेही आयोजित केली जात आहेत.

अभियानाचा महत्त्वाचा पैलू म्हणजे महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देऊन दीर्घकालीन सामाजिक बदल घडवणे. यामध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तन आणि गर्भाशयाचा कर्करोग, क्षयरोग, कुष्ठरोग, ॲनिमिया आणि सिकल सेल रोग यांची मोफत तपासणी करून आजारांची लवकर ओळख आणि उपचार शक्य होत आहेत. यामुळे मृत्यूदर कमी होऊन कुटुंबे मजबूत होत आहेत. गर्भवती महिलांसाठी हिमोग्लोबिन तपासणी, लसीकरण, प्रसूतीपूर्व काळजी आणि जननी शिशु सुरक्षा योजना तसेच जननी सुरक्षा योजनेंतर्गत मोफत सेवा देऊन माता-शिशू मृत्यूदर कमी करण्यावर भर आहे. तसेच, पोषण आणि जागरूकता सत्रांद्वारे संतुलित आहार, स्वच्छता आणि कुटुंब नियोजनाचे शिक्षण देऊन कुपोषण दूर होत आहे. प्रत्येक स्त्रीला आरोग्यविषयक आवश्यक सहाय्य आणि मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून तिला आरोग्य साक्षरतेकडे नेण्याचा मार्ग खुला होत आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब




कल्याण मंत्री तसेच पालकमंत्री कोल्हापूर, प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे अभियान केवळ आरोग्य तपासणीपुरते मर्यादित नसून, महिलांच्या आणि कुटुंबाच्या आरोग्यदायी भविष्यासाठी एक व्यापक आराखडा आहे. यात फक्त आजारांची तपासणी नव्हे, तर आरोग्य साक्षरता वाढवणे, महिलांचे आरोग्य बळकट करणे आणि कुटुंबातील प्रत्येक घटकाला सशक्त करणे हा उद्देश आहे. हे अभियान एकदाच होणारा उपक्रम नसून, आरोग्य विभागाची निरंतर चालणारी चळवळ आहे. या चळवळीमुळे महिलांचे आरोग्य सुधारेल, कुटुंब सशक्त होईल आणि परिणामी राज्याचा आरोग्य निर्देशांक उंचावेल. 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' ही संकल्पना महिलांच्या आरोग्य साक्षरतेवर केंद्रित आहे, जी वैयक्तिक आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी आधारस्तंभ आहे. महिलांना आरोग्याविषयी शिक्षण, जागरूकता आणि सुलभ सेवा मिळाल्यास त्या स्वतःच्या तसेच कुटुंबाच्या शारीरिक आणि मानसिक गरजा समजून योग्य निर्णय घेऊ शकतात. लहानपणापासून मुलींना पोषण, स्वच्छता आणि प्रजनन आरोग्याचे शिक्षण देणे, समुदाय कार्यशाळा आणि मराठीतून डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे माहिती पुरवणे प्रभावी ठरते. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे, आशा कार्यकर्त्या आणि मोबाइल क्लिनिक्सद्वारे सेवा पोहोचवल्या जात आहेत. पोषण, मासिक पाळी, गर्भनिरोध आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवून सामाजिक गैरसमज आणि लिंगभेद दूर करण्याचे काम होत आहे. आरोग्य साक्षर महिला कुटुंबाला संतुलित आहार, स्वच्छता आणि रोगप्रतिबंधक उपाय शिकवतात, ज्यामुळे मुलांचे शिक्षण आणि कुटुंबाची आर्थिक प्रगती साध्य होते. अशा महिलांमुळे सामाजिक बदल घडतो आणि समाज दीर्घकालीन प्रगतीकडे वाटचाल करतो. आरोग्य निर्देशांक वाढवण्याच्या दृष्टीने 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' ही संकल्पना निश्चितच राज्य आणि देशासाठी मैलाचा दगड ठरेल.

**- सचिन अडसूळ,**
जिल्हा माहिती अधिकारी,
कोल्हापूर
***

# स्टार्टअप्सच्या माध्यमाने महाराष्ट्रातल्या हजारो तरुणांना उद्योजक बनवणार, ग्रामीण युवकांनाही संधी मिळणार–कौशल्य विकास मंत्री श्री.मंगलप्रभात लोढा

## अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातून ७५ हजार तरुणांना स्वयंरोजगार आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण देणार

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)– महाराष्ट्र देशातील सर्वाधिक स्टार्टअप्स असणारे राज्य असून नव्या धोरणानुसार आता ग्रामीण भागातील हजारो तरुणांना स्टार्टअप्सच्या माध्यमाने यशस्वी उद्योजक घडवणार असल्याची ग्वाही कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी दिली. छत्रपती संभाजी नगर इथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. विकासाची दूरदृष्टी असलेले लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनात कौशल्य विभागाने स्टार्टअप्स संदर्भात नवे धोरण अमलात आणले असून त्यात ग्रामीण भागातील तरुणांसाठी विशिष्ट कोटा असल्याचेही मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले. कौशल्य विकास मंत्री श्री. मंगलप्रभात लोढाजी छत्रपती संभाजी नगर मधल्या आयटीआय संस्थांना भेटी देऊन विविध व्यावसायिक आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमांचा आढावा घेत आहेत.

कौशल्य विभागाच्या विविध उपक्रमांची रूपरेखा स्पष्ट करताना मंत्री लोढा म्हणाले की, कौशल्य विभागाने नुकतेच इनोव्हेटीव महाराष्ट्र राज्य स्टार्टअप्स २०२५ हे धोरण आणले आहे. या धोरणाच्या अनुषंगाने स्टार्टअप्स मधील ग्रामीण टक्का वाढवण्याचा तसेच ते स्टार्टअप्स यशस्वी करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री स्वयंम उद्योजकता व नाविन्यता महाफंड उभारण्यात येईल. शासनाकडे नोंद असलेल्या ३० लाख तंत्रशिक्षित युवक–युवतींना ईमेलद्वारे एआय परीक्षेत सहभागी केले जाईल. त्यातून पाच लाख उमेदवारांची निवड होईल. पुढील चाळणीनंतर १ लाख उमेदवारांना स्पर्धा, हॅकेथॉन व चाचण्यांतून संधी दिली जाईल. अंतिम टप्प्यात २५ हजार निवडक उमेदवारांना स्टार्ट अप सुरु करण्यासाठी तांत्रिक सहाय्य, आर्थिक मदत तसेच मार्केटिंगचे प्रशिक्षण देऊन स्टार्टअप्स आणि उद्योजकांची एक फळीच तयार केली जाईल. यासाठी राज्यात तालुका निहाय कोटा निर्धारित करण्यात येणार आहे. अंतिम निवड झालेल्या स्टार्टअप्ससाठी तरुणांनी घेतलेल्या कर्जाच्या ५० टक्के व्याजाचा भार सरकार उचलणार आहे. स्टार्टअप्स सुरु केलेल्या तरुणांच्या अधिक मदतीसाठी स्थानिक आयटीआय आणि इनोव्हेशन सेंटर सोबत जोडण्यात येईल.

राज्यातील युवा वर्गाची रोजगार क्षमता व स्वयंरोजगार क्षमता वाढवण्यासाठी ४१९ शासकीय आयटीआयमध्ये १०० हून अधिक विषयांवरील रोजगाराभिमुख अल्पकालीन अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याचबरोबर विशेष अभ्यासक्रमाद्वारे महिला उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी वाढवण्यावर भर देण्यात येईल. उद्योग व सेवा क्षेत्रास कुशल मनुष्यबळ पुरविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) केले जाते. या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये वर्गखोल्या, यंत्रसामग्री, प्रशिक्षक इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. या सुविधांचा अधिकाधिक उपयोग करत तिथे चालणाऱ्या नियमित वर्गाच्या आधी किंवा नंतर उपलब्ध होणाऱ्या वेळेत अल्पकालीन अभ्यासक्रम सुरु करण्याची संकल्पना मंत्री श्री.लोढा यांनी मांडली आहे. या उपक्रमाद्वारे उद्योगास आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. तसेच यातून स्वयंरोजगारासाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन देखील युवांना प्राप्त होऊ शकते. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या संस्था व्यवस्थापन समितीद्वारे हे अभ्यासक्रम निवडले व राबविले जाणार आहेत. याचा स्थानिक युवा, गृहिणी, विद्यार्थी यांच्यासोबतच उद्योग– व्यापार क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. सवलतीच्या शुल्कात चालविल्या जाणाऱ्या या अल्पकालीन अभ्यासक्रमांची सर्व माहिती तसेच नाव नोंदणीची सुविधा https://admission.dvet.gov.in / https://msbsvet.edu.in / https://msbsvet.edu.in/Public/ITIShortTermTraining या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच या संदर्भातील अधिक महिती आपल्या जवळच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपलब्ध होईल. तरी वरील संकेतस्थळावर भेट देऊन जास्तीत जास्त युवा, गृहिणी यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन कौशल्य विकास मंत्री श्री मंगलप्रभात लोढा यांनी केले आहे.

**राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थामध्ये सुरु असलेले उपक्रम–**

राज्यातल्या विविध भागात सुमारे एक हजार रोजगार मेळाव्याचे नियोजन करण्यात येत आहे. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने सेवा पंधरवडा कार्यक्रम. राज्यातील ४१९ आयटीआयच्या विद्यार्थ्यांनी ७५० गावात स्वच्छता अभियान राबवले.

**पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव**

समाजातला शेवटचा घटक म्हणजेच अंत्योदय ही वैश्विक संकल्पना पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडली. अंत्योदयाच्या माध्यमानेच लोकशाहीच्या उदिष्टांची पूर्ती होईल,हा मौलिक विचार पंडितजींनी ६० वर्षांपूर्वी मुंबईतल्या रुईया महाविद्यालयातल्या एकात्म मानव दर्शन व्याख्यानात मांडला.

या ऐतिहासिक घटनेला साठ वर्ष पूर्ण होत असल्याच्या निम्मिताने राज्यातल्या शासकीय आणि खाजगी मिळून सुमारे एक हजार आयटीआय संस्थेत पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव साजरा करण्यात येत आहे. व्याख्यानं, परिसंवाद आणि पंडितजींच्या जीवनावर चित्र प्रदर्शन या माध्यमाने पंडितजींचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. राष्ट्रसेवा आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये जागृत व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम राबवला जात आहे.

## सोनाटा फेस्टिव्ह कलेक्शन २.० वाढवते उत्सवाची चमक

ठाणे दि.३० (प्रतिनिधी)– उत्सवाचा हंगाम जवळ आला आहे, सोनाटा आपले फेस्टिव्ह कलेक्शन २.० सादर करत आहे. वेळ आणि परंपरा साजरी करणारी हि घड्याळे. भेटवस्तू देण्याचा आनंद द्विगुणित करतात. ही नवीन घड्याळे आधुनिक डिझाइन आणि उत्सवाच्या भव्यतेचे मिश्रण आहेत. या मुळे ते विशेष क्षण साजरा करण्यासाठी परिपूर्ण पर्याय ठरत आहे.

पुरुषांच्या संग्रहातील प्रत्येक घड्याळ समृद्ध डायल, बोल्ड केस बॅकड्रॉप किंवा सोनाटाच्या क्लासिक रोमन मार्कर आणि क्रोको–पॅटर्न स्ट्रॅप्ससह भव्यता दर्शवते. निळ्या आणि हिरव्या रंगाचे रंगीत डायल त्यांचे आकर्षण वाढवतात, तर क्रोनोग्राफ, मल्टीफंक्शन डे आणि डेट आणि डायलवरील सूर्य आणि चंद्र निर्देशक यासारख्या कार्यात्मक वैशिष्ट्यांमुळे त्यांना केवळ एक आकर्षक लूक मिळत नाही तर उत्कृष्ट कारागिरीसह व्यावहारिकता देखील प्रदान होते. या सर्व तपशीलांमुळे हा संग्रह उत्सवपूर्ण आणि सुंदर बनतो, ज्यामुळे ते खास क्षणांचे स्मरण करण्यासाठी आणि भेटवस्तू देण्यासाठी परिपूर्ण बनतात.

महिलांच्या संग्रहाबद्दल बोलायचे झाले तर, ही घड्याळे उत्कृष्टपणे बनवलेल्या जाळीदार ब्रेसलेट, चमकणारे स्टड पीस आणि विविध आकारांच्या लिंक्ससह चमकदार रोजगोल्ड च्या पट्ट्यांनी भरलेली आहेत. पॉलिश केलेले फिनिश आणि उत्सवाचे ग्लॅमर हे सुनिश्चित करते की प्रत्येक घड्याळ विशेष प्रसंगी कोणत्याही पोशाखाला पूरक आहे आणि भेटवस्तू देण्यासाठी देखील आदर्श आहे.

या प्रसंगी बोलताना, सोनाटाचे उत्पादन प्रमुख निशांत मित्तल म्हणाले, ''फेस्टिव्ह कलेक्शन २.० हे सर्व काही स्टाईलमध्ये उत्सव साजरे करण्याबद्दल आहे.

आम्हाला या हंगामात प्रत्येक घड्याळ आनंद आणि उबदारपणाची अभिव्यक्ती बनवायची होती – तुम्हाला ते स्वतः घालायचे असेल, भेटवस्तू द्यायचे असेल किंवा फक्त उत्सव साजरे करायचे असतील तर ते अगदी योग्य आहे . संग्रहातील प्रत्येक घड्याळ तुमच्या खास क्षणांमध्ये चमक आणण्यासाठी आणि अविस्मरणीय आठवणी निर्माण करण्यासाठी डिझाइन केलेले आहे.

## महाराष्ट्र आणि गोव्यात मागील वर्षीच्या तुलनेत यंदा दसऱ्याच्या आधी बस बुकिंगमध्ये ३१ टक्के वाढ

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)– दसरा आता अवघ्या काही दिवसांवर आला आहे. अशात महाराष्ट्र आणि गोव्यातील बस बुकिंगमध्ये ३१ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. रेडबस व्यासपीठावरील माहितीच्या आधारे हे निरिक्षण नोंदवण्यात आले आहे. यात यंदाचा दसऱ्याचा काळ (२२ सप्टेंबर– २ ऑक्टोबर) आणि मागील वर्षीच्या या सणाचा कालावधी (३ ऑक्टोबर– १२ ऑक्टोबर) याची तुलना करण्यात आली आहे.

रेडबसच्या माहितीनुसार, ही वाढ म्हणजे सणाच्या काळात प्रादेशिक आणि शहरांमधील प्रवासात वाढ होत असल्याचे द्योतक आहे. अनेकजण कुटुंबाला भेट देणे किंवा नव्या ठिकाणी जाण्याचे प्लॅन करतात. यासाठी रस्ते वाहतूक हा प्रवासाचा प्राधान्यक्रमाचा पर्याय ठरतो. या माहितीतून प्रवासाचा प्राधान्यक्रम, लोकसंख्या आणि महाराष्ट्र तसेच गोव्यातील लोकप्रिय मार्ग अशा विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. यंदा राज्यातील नागरिक दसऱ्यासाठी काय तयारी करत आहेत, याचे साधारण चित्र यामुळे स्पष्ट झाले आहे.

## मेडिकव्हर हॉसिटलमध्ये जागतिक हृदय दिन साजरा

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)–मेडिकव्हर हॉसिटलने जागतिक हृदय दिन साजरा करण्यासाठी एक माहितीपूर्ण आणि आकर्षक कार्यक्रम आयोजित केला, ज्यामध्ये रुग्णालयात व शहरात सीपीआर चे प्रशिक्षण देण्यात आले . हृदय विकार तज्ञा तर्फे निरोगी आयुष् कसे असावे ह्या संदर्भात माहिती दिली. मेडिकव्हर रुग्णालयात रुग्णच्या नातेवाईक यांना सीपीआर चे प्रशिक्षण दिले गेले ,हृदय आरोग्य जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित केले.

जागतिक हृदय दिनाचे महत्त्व आणि तो हृदय आरोग्याची जागतिक आठवण करून देणारा कार्यक्रम सादर करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मेडिकव्हर हॉस्पिटल डॉक्टरांनी भारतातील वाढत्या हृदयरोगांच्या आकडेवारीवर आणि जीवनशैलीतील बदल हृदय आरोग्य सुधारण्यास कसे योगदान देऊ शकतात यावर चर्चा झाली.

मेडिकव्हर हॉस्पिटल च्या सेंटर हेड, डॉ. विशाल कुटे यांनी या उपक्रमाबद्दल आपले विचार मांडले: ते म्हणाले, आम्ही मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये लवकर निदान लवकर उपचार व्हावे, प्रतिबंधात्मक उपाय योजना करता याव्यात यासाठी संभाजीनगरकरांच्या आरोग्यासाठी ''जागतिक हृदय दिन निमित्त,आमची भागीदारी जनतेला शिक्षित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या माध्यम व्यावसायिकांमध्ये जागरूकता पसरवणे आहे. आम्हाला विश्वास आहे की योग्य ज्ञानाने व्यक्तींना सक्षम करून, आपण हृदयरोगांशी लढण्यात महत्त्वपूर्ण परिणाम करू शकतो.''

त्यानंतर अनुभवी डॉक्टरांच्या नेतृत्वाखाली एक व्यापक सीपीआर प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले, नवरात्री निमित्त महिला भाविकांना मंदिरात सीपीआर चे तंत्र समजून सांगितलं व त्यांच्या कडून प्रात्यक्षिक करून घेतले. तसेच शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना स्टेजवर सराव करण्यासाठी आणि तंत्रे समजून घेण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. या प्रत्यक्ष प्रशिक्षणात हृदयरोगाच्या आपत्कालीन परिस्थितीत जलद कृती करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले, जे जीवन आणि मृत्यूमध्ये फरक करू शकते. सर्व मान्यवरांनी मिळून हृदयासाठी हानिकारक असणारे सर्व घटक फुग्यावर लिहून इच्छा स्वरूप हवेत सोडण्यात आले.

येत्या काळात पंचवीस हजार नागरिकांना सीपीआर ट्रैनिंग देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. कार्यक्रमास सेंटर हेड डॉ विशाल कुटे, हृदय रोग तज्ञ् डॉ तुकाराम औटे, डॉ मनीष पुराणिक, डॉ विक्रांत देशमुख, डॉ कुलदीप तोतावार यांची उपस्थिती होती.

## विकास निधी कमी पडू देणार नाही, शिऊर येथील कार्यक्रमात पालकमंत्र्यांची ग्वाही

शिऊर दि.३० (प्रतिनिधी)– शिऊर येथील आनंद कौशल्याय बुद्ध विहार मंडळासाठी एक कोटी रुपयांच्या सांस्कृतिक सभागृह व बुद्ध विहार बांधकामाचे भूमिपूजन पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते झाले. आमदार प्रा. रमेश बोरणारे यांच्या विशेष प्रयत्नातून सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या निधीतून हे काम मंजूर झाले. पूज्य भंते बोधिधम्मा थेरो, भंते पत्रवंत, भंते पत्रजीत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

मंत्री शिरसाट म्हणाले, विकासासाठी कितीही निधी मागा, कमी पडू देणार नाही. मात्र अशी कामं करा, जी आयुष्यभर लक्षात राहतील. या ठिकाणी अभ्यासिका उभारली जात आहे. यातून अभ्यास करून मुलं मोठे अधिकारी बनली, तर त्यांचा आनंद आणि आठवण कायम राहील. त्यामुळे हे पुण्याचं काम ठरेल. या गावाशी माझे जुने संबंध आहेत. कोण किती दिवस पदावर होता, यापेक्षा पदावर असताना काय काम केलं, हे लोक लक्षात ठेवतात. एक कोटी काय, आणखी निधी लागला तरी देऊ, असेही त्यांनी सांगितले. आमदार बोरणारे म्हणाले, सभागृह होईल की नाही, याबाबत शंका होती. मात्र मी शब्दाला जागणारा आमदार आहे. माझ्या शब्दावर विश्वास ठेवा, अशी ग्वाही दिली होती. आज त्या शब्दाला अनुसरून एक कोटींच्या सभागृहाचे भूमिपूजन झाले. वैजापूर तालुक्यातील मोठ्या वस्त्यांमध्ये अशा प्रकारची सामाजिक सभागृहं उभारण्याचा मानस आहे. कार्यक्रमाला माजी उपनगराध्यक्ष साबेरभाई, बाजार समितीचे सभापती रामहरी जाधव, डॉ. जे. के. जाधव, भागीनाथ मगर, आनंद निकम, नवनाथ निमसे, सरपंच किरण झिंजुर्डे, उपसरपंच नंदकिशोर जाधव, माजी सरपंच चंद्रशेखर खांडगौरे, नितीन चुडीवाल, भास्कर जाधव, राजेंद्र जाधव, बाळू पवार, कांताबाई पगारे,



वाल्मीक भावसार, कारभारी जाधव आदी उपस्थित होते. भरपाई देण्यासाठी निवेदन शिऊर व परिसरात संततधार होत असलेल्या पावसामुळे परिसरातील शेती पिक पाण्याखाली येऊन उद्धवस्त झाल्याने शेतकऱ्यांना तातडीने पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात यावे, यासाठी शिऊर ग्रामपंचायत, विकास सोसायटी व सामाजिक कार्यकर्त्यांनी पालकमंत्री शिरसाट यांना निवेदने दिली.

## स्वच्छता ही सेवा २०२५ छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)– ''२५ सप्टेंबर २०२५ एक दिवस एक तास एक साथ'' या केंद्र सरकार व राज्य सरकारच्या उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने शहरातील सर्व मनपा शाळा तसेच खासगी शाळामध्ये हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविला. जवळपास १०० पेक्षा जास्त शाळा तसेच महानगरपालिका क्षेत्रीय कार्यालय परिसर, इ ठिकाणी हे स्वच्छता अभियान घेण्यात आले.

या उपक्रमाचा मुख्य कार्यक्रमाची सुरुवात आज नारेगाव मनपा उर्दू व मराठी शाळा येथे स्वच्छता अभियान घेऊन करण्यात आली. यावेळी शाळा व शाळेचा आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच शहरातील इतर मनपा शाळांमध्ये चालू असलेल्या कामांना उपायुक्त यांनी विशेष भेटी दिल्या त्यामध्ये प्रामुख्याने प्रियदर्शनी इंदिरानगर मनपा शाळा, गारखेडा मनपा शाळा, मनपाच्या सीबीएससी शाळा, इ शाळांना भेटी दिल्या. सर्व शालेय विद्यार्थी, प्रमुख मान्यवर यांच्या उपस्थितीत संपूर्ण परिसर एक तास श्रमदान करून स्वच्छ करण्यात आला.

यावेळी मानवी साखळी द्वारे भारत देशाचा नकाशा आखण्यात आला तसेच उपायुक्त श्री. नंदकिशोर भोंबे सर यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली व विद्यार्थ्यांना घर–शहर–परिसर स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. तसेच शहरातील सर्व शाळांमध्ये शालेय शिक्षक वृंद, शालेय विद्यार्थी, स्वच्छता कर्मचारी, इ सर्वांनी मिळून परिसर स्वच्छ केला. उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन प्रमुख श्री नंदकिशोर भोंबे सर, उपायुक्त शिक्षण विभाग श्री. अंकुश पांढरे सर, सहाय्यक आयुक्त प्राजक्ता वंजारी मॅडम, भारत तिनगोटे शिक्षण अधिकारी, रामनाथ थोरे विस्तार अधिकारी, ज्ञानदेव सांगळे कार्यक्रम अधिकारी, स्वच्छता अधिकारी श्री अनिल जाधव सर , स्वच्छता अधिकारी श्री सचिन भालेराव सर, किरण जाधव, चेतन वाघ, गोविंद बारबोटे अधीक्षक शिक्षण विभाग, संगीता ताजवे मुख्याध्यापक नारेगाव मराठी, अब्रार अहमद मुख्याध्यापक नारेगाव उर्दू, प्रियदर्शनी इंदिरानगर येथे संजीव सोनार मुख्याध्यापक, गारखेडा येथे शशिकांत उबाळे मुख्याध्यापक, बावस्कर सर, तबडे सर, जुबेर सर, बाबुराव राठोड शिक्षक, स्वच्छता निरीक्षक सौरव घोरपडे ,स्वच्छता निरीक्षक रेणुका गायकवाड, स्वच्छता निरीक्षक अतिश खरात,राहुल बोर्डे, रेड्डी झोनल दिनेश बियाणी, स्वच्छता जवान संकुल मलके, राजू साबळे, रेड्डी सुपरवायझर रवी दांडगे, संदीप नरवडे, तसेच शिक्षण विभागाचे अधिकारी कर्मचारी, नारेगाव मनपा शाळेतील सर्व शिक्षक वृंद, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता जवान, स्वच्छता कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी, इ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुक्त विद्यापीठ व्यवस्थापन मंडळावर तीन नवे सदस्य डॉ. गुजराथी, डॉ. निकुंभ व फडणवीस यांची नियुक्ती

नाशिक दि.३० (प्रतिनिधी)– महाराष्ट्राचे राज्यपाल आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलपती माननीय श्री आचार्य देवव्रत यांनी विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर तीन महत्वपूर्ण व्यक्तींची नेमणूक केली आहे. डॉ. गुजराथी दत्तात्रय मनोहर, डॉ. अक्षया निकुंभ व श्री प्रसेनजित श्रीकृष्ण फडणवीस अशी नियुक्त सदस्यांची नावे आहेत. ही नेमणूक तीन वर्षांसाठी असणार आहे. विद्यापीठ अधिनियम १९८९ नुसार व विद्यापीठाचा कारभार अधिक पारदर्शक व विश्वासार्ह व्हावा यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे.

मुक्त विद्यापीठ व्यवस्थापन मंडळावर निवड झालेले सदस्य डॉ. गुजराथी दत्तात्रय मनोहर हे पीएच.डी., एम.फिल., एम. कॉम. आणि बी.कॉम. यांसारख्या उच्च पदव्या विशेष प्रावीण्यासह मिळवलेले व्यवस्थापन आणि वाणिज्य क्षेत्राचे तज्ज्ञ व्यक्ति आहेत. त्यांना या क्षेत्रात ३८ वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे. त्यांनी नाशिक येथील अशोका बिझनेस स्कूलचे संचालक आणि अशोका सेंटरचे प्राचार्य म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. त्यांना पुणे विद्यापीठातील सर्वोत्कृष्ट वाणिज्य शिक्षक म्हणून जी.बी. कुलकर्णी पुरस्काराने गौरवण्यात आले आहे, तसेच त्यांनी पुणे विद्यापीठाच्या कॉस्टिंग, अकाउंटन्सी, बीबीए बोर्डाचे माजी अध्यक्ष आणि शैक्षणिक परिषदेचे माजी सदस्य म्हणून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ते एक यशस्वी संशोधक मार्गदर्शक असून, त्यांनी ९ पीएच.डी. व ६ एम.फिल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. त्यांचे २५ शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झाले आहेत; याव्यतिरिक्त, ते सहकार भारती, नाशिकचे उपाध्यक्ष, वेगो लायब्ररी फाउंडेशनचे प्रकल्प संचालक अशा विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यांमध्ये सक्रिय आहेत.ते अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील एस. एन. आर्ट्स, डी. जे. एम. कॉमर्स आणि बी. एन. एस. सायन्स महाविद्यालयात कार्यरत आहेत. दुसऱ्या तज्ज्ञ व्यक्ति डॉ. अक्षया निकुंभ यांची निवड संशोधन क्षेत्रातून झाली आहे. त्या भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (आयआयटी बॉम्बे) येथील हवामान अभ्यास केंद्रात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळूर येथून हवामान आणि महासागर विज्ञानात पीएच.डी. पूर्ण केली असून, त्यांना त्यांच्या सर्वोत्कृष्ट प्रबंधासाठी रॉडम कुटुंब पदक मिळाले आहे. यापूर्वी, त्यांनी प्रिन्सटन विद्यापीठ आणि – मध्ये पोस्टडॉक्टोरल संशोधन सहकारी म्हणून काम केले आहे. मोठ्या प्रमाणातील हवामान गतिकी, पर्जन्य तीव्रता आणि मान्सून हे त्यांच्या संशोधनाचे मुख्य विषय असून, त्यांचे महत्त्वपूर्ण शोधकार्य जिओफिजिकल रिसर्च लेटर्स आणि जर्नल ऑफ ॲटमॉस्फेरिक सायन्स यांसारख्या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहे. त्यांना यंग फॅकल्टी पुरस्कार ( बॉम्बे २०२४), पोस्टडॉक्टोरल फेलोशिप आणि फुलब्राइट कलाम हवामान फेलोशिप यांसारखे अनेक महत्त्वाचे पुरस्कार आणि फेलोशिप्स प्राप्त झाले आहेत. त्या सध्या मान्सून मिशन फेज अंतर्गत एका मोठ्या संशोधन प्रकल्पात सह–मुख्य अन्वेषक म्हणून कार्यरत आहेत.

तिसरे तज्ज्ञ व्यक्ति श्री. प्रसेनजित श्रीकृष्ण फडणवीस यांची पार्श्वभूमी औद्योगिक क्षेत्रातील आहे. ते पुण्यात एसपीपीयू एज्युटेकचे संचालक आहेत. ते सायबर सुरक्षा व बौद्धिक संपदा विषयातील तज्ज्ञ आहेत. विद्यार्थी दशेपासून श्री. फडणवीस अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. २०१७–२०२२ या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे ते सदस्य होते. तसेच याच विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य म्हणून गेली आठ वर्षे ते कार्यरत आहेत. अधिसभेत विविध विषयांवर त्यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे.

> राज्यपाल यांनी मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर डॉ. गुजराथी, डॉ. निकुंभ व श्री. फडणवीस या तीन अनुभवी, तज्ज्ञ व कार्यक्षम व्यक्तींची नियुक्ती केली आहे. त्यांचे विद्यापीठ परिवारात स्वागत आहे. या नव्या सदस्यांमुळे मुक्त विद्यापीठाला त्यांच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील अनुभवाचा फायदा मिळणार आहे. तसेच विद्यापीठाच्या प्रगतीचा मार्ग अधिक प्रशस्त होणार आहे.
>
> **–प्रा. संजीव सोनवणे**
>
> मा. कुलगुरू
>
> यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# अभिनव उद्योग धोरणामुळे राज्य देशात अव्वल-उद्योग मंत्री उदय सामंत

## ऑरिक सिटी वर्धापन दिन, समृद्धी जोडमार्गाचे उद्योग मंत्री सामंत यांच्या हस्ते लोकार्पण

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- ऑरिक सिटीच्या ६ व्या वर्धापन दिनानिमित्त समृद्धी जोडमार्गाचे लोकार्पण उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी राज्यशासन अभिनव धोरणे राबवित आहे. त्याचाच परिणाम म्हणून महाराष्ट्र देशात औद्योगिक गुंतवणूकीत अव्वल आहे. छत्रपती संभाजीनगर येथे गुंतवणूकीस उद्योग जगताची पसंती आहे. त्यासाठी येथील उद्योग व संलग्न क्षेत्राच्या विकासासाठी शासन कटीबद्ध आहे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज येथे केले.

शेंद्रा येथील ऑरिक सिटी या पंचतारांकीत औद्योगिक वसाहतीचा ६ वा वर्धापन दिन व समृद्धी महामार्ग ते शेंद्रा औद्योगिक वसाहत जोडमार्गाचे लोकार्पण आज करण्यात आले. या कार्यक्रमास उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे,खा. डॉ. भागवत कराड, खा. संदिपान भुमरे, महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप चे व्यवस्थापकीय संचालक पी.डी. मलिकनेर, सह व्यवस्थापकीय संचालक दत्ता भडकवाड,भास्कर मुंडे, विजय राठोड, अभिजित राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

ऑरिक सिटी सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात उद्योग मंत्री सामंत यांच्या हस्ते बोधचिन्ह, संकेतस्थळ, पोर्टल यांचे अनावरण करण्यात आले. तसेच ऑरिक सिटी च्या सहा वर्षाच्या वाटचालीचा वेध घेणाऱ्या कॉफी टेबल बुक चे विमोचन करण्यात आले.

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे म्हणाले की, औद्योगिक वसाहत समृद्धी महामार्गाला जोडल्यामुळे वाहतुकीची मोठी सोय झाली आहे, शिवाय शहरातील रहदारीचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. याठिकाणी शेंद्रा ते बिडकीन या स्वतंत्र रस्त्याचे काम केल्यास आणखीन सुविधा होणार आहे. उद्योजकांची मागणी पाहता आणखीन भुसंपादन करून जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी श्री. सावे यांनी केली. उद्योग मंत्री सामंत म्हणाले की, अतिवृष्टी ने बाधित शेतकऱ्यांना शासन वाऱ्यावर सोडणार नाही. या संकटात शासन पूर्णपणे त्यांच्या पाठीशी आहे. उद्योग जगतानेही या आपल्या संकटात सापडलेल्या भावांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीत सहयोग द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, ऑरिक सिटीचे यश हे त्यासाठी जमीन देणारे शेतकरी आणि त्यावर उद्योग उभारून गुंतवणूक करणारे उद्योजक या दोघांचे आहे. या वसाहतीचे आणखीन प्रश्न सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशिल आहे. अतिवृष्टीमुळे औद्योगिकक्षेत्रानजिक शेती, गावांना काही समस्या निर्माण झाल्या, त्यावर कायमस्वरूपी उपाय योजना नजिकच्या काळात करण्यात येतील. येत्या वर्षभरात आणखीन ५ हजार एकर जागा उपलब्ध करून देऊ. बिडकीन या औद्योगिक वसाहतीनजिक असणाऱ्या शेतकऱ्यांचे आणि प्रकल्प बाधितांचे प्रश्न एक महिन्याच्या आत सोडवावे, असे निर्देश त्यांनी दिले.

ऑरिक सिटीचे कामकाज प्रभावी करण्यासाठी अधिकाऱ्यांचे जॉब कार्ड तयार




करू. आपण स्वतः प्रत्येक महिन्यात एकदा येऊ, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्याने उद्योग क्षेत्रासाठी नवीन १२ धोरणे निश्चित केली आहेत. त्यामुळे उद्योग क्षेत्रात राज्य देशात क्रमांक १ वर आहे. येत्या वर्षभरात आणखीन ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणे अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक व्यवस्थापकीय संचालक पी. डी. मलिकनेर यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# एक पेड मा के नाम हे अभियान बूथ स्तरापर्यंत राबवून वृक्ष लागवड करा-भास्कर दानवे

जालना दि.३० (प्रतिनिधी)- पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती निमित्त सेवा पंधरवाडा अभियान अंतर्गत एक पेड मा के नाम हे अभियान जिल्हा स्तरापासून ते बूथ स्तरापर्यंत यशस्वीपणे राबवून वृक्षरोपण करा असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी कार्यालय, जालना येथे (दि.२६ सप्टेंबर) आयोजित कार्यक्रमात कार्यकर्त्यांना केले.



यावेळी माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर पाटील भांदरगे, माजी महानगर जिल्हाध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर, सतीश जाधव, युवा नेते अक्षय भैया गोरंटयाल, माजी सरचिटणीस देविदास देशमुख, महानगर महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ.शुभांगीताई देशपांडे, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षा सौ.संध्याताई देठे, सरचिटणीस अरुणाताई जाधव, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, धनराज काबलिये, प्रा.राजेंद्र भोसले मंडळ अध्यक्ष सुनील खरे, महेश निकम, अमोल धानुरे, संजय डोंगरे, नगरसेवक शशिकांत घुगे, रमेश गौरक्षक, जिवन सले, नंदकिशोर गरदास इत्यादी उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, वृक्ष लागवड हि काळाची गरज असून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड करणे अतिशय महत्वाचे आहे, यावेळी त्यांनी जालना जिल्हा लोकनेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनात जालना शहरामध्ये हजारो वृक्ष लागवड केली असून त्यांचे संगोपन हि आपण केल्याचे त्यांनी सांगितले, झाडांना जाळी, टँकर द्वारे पाणी झाडांना टाकून आज लागवड केलेल्या वृक्षा पैकी हजारो रोपट्यांचे वृक्षात रुपांतर झाले असल्याचे सांगितले. यावेळी भाजपा कार्यालय समोर व मुक्तेश्वर लॉन्स येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल परिसरामध्ये प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी बाबा उगले, रवी अग्रवाल, राजू गवई, वर्षा ठाकूर, मंदाताई पवार, वैशाली बनसोडे, दिपाली बिन्नीवाले, वंदना ढगे, शितल तनपुरे, अमोल कारंजेकर, सुभाष सले, अनिल सरकटे, गजानन खरात,

बाबुराव भवर, रामलाल जाधव, काकासाहेब घुले, गणेश जल्लेवार, राजाराम जाधव, सतीश केळकर, जगदीश येनगुपटला, शाम उगले, हरिभाऊ गोरे, नागेश अंभोरे, प्रशांत आढावे, बद्री वाघ, डोंगरसिंग साबळे, दौलत भुतेकर, महेश मुळे, सेवकराम नारियलवाले, श्रीराम वाघ, सुदर्शन काळे, निलेश गवळी, कैलास उबाळे, विष्णू डोंगरे, उद्धव ढवळे, कृष्णा गायके, संतोष खंडेलवाल, योगेश शिमगे आदींची उपस्थिती होती.

# मराठी भाषेवर कुठलेही अतिक्रमण होणार नाही यासाठी सजग राहण्याचे आव्हान-कौतिकराव ठाले पाटील

जालना दि.३० (प्रतिनिधी)- येथे मराठवाडा साहित्य परिषदेचे ८२ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील हे होते तर उद्घाटक म्हणून प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव, विषेश सत्कारमुर्ती सौ. रेखाताई बैजल, तर प्रमुख उपस्थितीत प्रा. दादा गोरे, कार्यवाहक आसाराम लोमटे, रामचंद्र तिरुखे,उपाध्यक्ष, रामचंद्र काळुंखे, प्रा.गणेश मोहिते,प्रा.राम अग्रवाल,प्रा.गणेश अग्निहोत्री,सुभाष कोळकर,जालना शाखा मराठवाडा साहित्य परिषद अध्यक्ष रविंद्र तौर,बाळासाहेब तनपुरे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले. मान्यवरांच्या सत्कारानंतर प्रसिद्ध लेखीका रेखा बैजल यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात कौतिकराव ठाले पाटील यांनी मराठी भाषा व साहित्य समृद्ध करण्यासाठी तसेच मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी व मराठी भाषा राजभाषा असतांना इतर भाषेची सक्ती कशाला ? असा आक्रमक सवाल याप्रसंगी मांडून इतर भाषेला राज्यात विरोध करणे आवश्यक असल्याचे सांगितले.व मराठी भाषा टिकवण्यासाठी सजग राहण्याचे आव्हान स्विकारावे लागेल असे सांगितले.मराठवाड्याने अनेक नामवंत साहित्यिक महाराष्ट्राला दिले. सर्वाधिक पारतंत्र्यात राहिलेला मराठवाडा साहित्य क्षेत्रात आघाडीवर असल्याचे गौरवोद्गार त्यांनी याप्रसंगी काढले! मसाप च्या कार्याचा आढावा घेतला व पुढील काळात या संस्थेचे कार्य पुढे नेण्यासाठी तरुणांनी पुढे यावे यासाठी आवाहन केले.

जालना शाखा अध्यक्ष रविंद्र तौर यांनी प्रास्ताविक करताना जिल्ह्यातील मराठी साहित्यकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी घेऊन मसाप चे सर्व कार्यक्रम यशस्वीपणे राबवण्याची ग्वाही दिली. याप्रसंगी जालना शाखे मार्फत होणाऱ्या विविध उपक्रमाची माहीती दिली. प्रमुख अतिथी प्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव बोलताना म्हणाले की मराठवाड्यातील मसाप ही मातृसंस्था असून पर्याय म्हणून अनेक संस्था या ठिकाणी उभा राहिल्या परंतु त्या टिकल्या नाहीत शुद्ध हेतूने काम करणारी मसाप सर्व समाज घटकांना घेऊन प्राचार्य कौतिकराव ढाले पाटील यांच्या नेतृत्वाखाली खूप चांगल्या पद्धतीने काम करीत आहे मसाप कडून समाजाला मोठ्या अपेक्षा आहेत असे सांगीतले.

# जालना जिला मारवाड़ी महिला सम्मेलन तर्फे दानकुँवर विद्यालयमध्ये नवरात्र पर्व मध्ये कन्यापुजन व कन्याभोजन कार्यक्रम संपन्न

जालना दि.३० (प्रतिनिधी)- अखिल भारतीय मारवाड़ी जालना जिला सम्मेलन तर्फे शारदीय नवरात्र उत्सवा निमित्त दानकुँवर कन्या विद्यालय येथे १०८ विद्यार्थिनीं चे कन्यापुजन व कन्याभोजन चे आयोजन जिलाध्यक्षा श्रीमति सावित्रीदेवी मल्लावत यांनी केले. सुरवाती ला पुष्पवर्षा करुन सर्वांचे स्वागत करण्यात आले. सम्मेलन च्या सदस्यांनी मां दुर्गादेवी ची पूजा करुन भक्ती भावा ने आरती केली. नैवेद्य दाखविला. नंतर सर्व बालिकांचे पूजन करुन टीका लावून कन्याभोजन ला भक्ती भावा ने बसविले. कन्याभोजन झाल्यानंतर सर्वांना भेटवस्तु आलेल्या प्रत्येक सदस्यांनी दिल्या. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.प्रतिभा पाटिल यांचे जिलाध्यक्षा सावित्रीदेवी मल्लावत यांनी बुके व मोतीमाला देवून सत्कार केला. या कन्यापुजन व कन्याभोजन कार्यक्रमा साठी सौ.विद्या गोयल, शोभा देवीदान, स्मिता चेचाणी, शकुंतला देवीदान, पुष्पा निमोदिया मीरा देवीदान, अनिता बंसल, ऊषा देवीदान, शांता देवीदान, राजकुमारी गुप्ता, नीता बगडीया,तारा शर्मा, सीमा देवीदान, राधा गुप्ता, सरोज लदनिया, इंदु भारूका, शाता मल्लावत, उमा मल्लावत, प्रेमा अग्रवाल, कविता पित्ती, उमा पित्ती व सदस्य मे शोभा खंडेलवाल और इंदु निमोदीया अनिता शर्मा नी परिश्रम घेतले. सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी रित्या संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दानकुँवर शाळेच्या सर्व शिक्षिका, कर्मचारी वर्ग यांना केलेल्या सहकार्या बद्दल जालना जिलाध्यक्षा श्रीमती सावित्रीदेवी मल्लावत यांनी आभार मानले. सर्वांनी या कार्यक्रमा चे यशस्वी झाल्या बद्दल आभार मानले.कन्याभोजन च्या कार्यक्रमा नंतर सर्वांचा आवडता दांडिया रास व गरबा नृत्याचा कार्यक्रम धेण्यात आला.

# सदृढ जालनाच्या दिशेने वाटचाल-माजी प्रांतपाल जयपुरिया

## लायन्स तर्फे काद्राबादमध्ये १५० नागरिकांची नेत्र तपासणी

जालना दि.३० (प्रतिनिधी)- नवरात्र उत्सवानिमित्त लायन्स क्लब ऑफ जालना, जालना महानगरपालिकेतील आयुष्यमान भारत नागरी आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी ( ता. २६) काद्राबाद परिसरातील डॉ. पाकणीकर हॉस्पिटल येथे गर्भवती स्त्रियांसह गरजू नागरिकांसाठी आयोजित मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबिरात १५० नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया यांनी या प्रसंगी बोलतांना स्वच्छ, सुंदर शहरानंतर आता सदृढ जालना या दिशेने वाटचाल सुरू सुरू झाली आहे असे सांगून महानगर पालिकेसोबत लायन्स क्लब गरज पडेल तिथे लोकोपयोगी उपक्रम राबविण्यास तयार असल्याचे जयपुरिया यांनी सांगितले. मनपाचे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी आरोग्य व्यवस्थापक डॉ.दीपक भालेराव,माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया,

विजय बगडिया,मनपाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. संगीता देशमुख, लायन्स च्या आरोग्य विभागाचे प्रांत प्रमुख अरुण मित्तल, लायन्स क्लब ऑफ जालना चे अध्यक्ष राधेश्याम टिबडेवाल ,सचिव राजेश खिस्ते, कोषाध्यक्ष रतन बजाज, प्रकल्प प्रमुख रवींद्र हुसे, पी.के.खरात , बळीराम बेंद्रे ,डॉ.विठ्ठल दराडे, डॉ.गिरीश




पाकणीकर, डॉ. माधुरी पाकणीकर, लायन्स प्रांत सहसचिव मीनाक्षी दाड, सुनील बियाणी, शामसुंदर लोया,द्वारकादास मुंदडा, विजय दाड, नंदकिशोर अग्रवाल, राम अग्रवाल, बद्रीनारायण बियाणी आदींची उपस्थिती होती. दिवसभर चाललेल्या शिबिराचा २५० नागरिकांनी लाभ घेतला.पैकी १५० जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. आठ मोतियाबिंदू चे रुग्ण आढळले. तसेच ८७ गर्भवती महिलांची रक्त, थायरॉईड तपासणी करण्यात आली. शिबीरास माजी आ. कैलास गोरंट्याल, माजी नगराध्यक्षा संगीताताई गोरंट्याल, सुभाषचंद्र देविदान, अशोक मिश्रा, अशोक कोटेचा यांनी भेट दिली.

# मोतीराम अग्रवाल जालना मर्चेंटस् को. ऑप. बँकेची ३० वी वार्षीक सर्वसाधारण सभा संपन्न

जालना दि.३० (प्रतिनिधी)- मोतीराम अग्रवाल जालना मर्चेंटस् को. ऑप. बँकेची ३० वी वार्षीक सर्वसाधारण सभा रूपम हॉल, जालना येथे अध्यक्ष सी.ए.श्री गोपाल अग्रवाल यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सर्वप्रथम नैसर्गिक आपत्तीमुळे, राजकीय, सामाजिक, कला, साहित्य, सहकार क्षेत्रातील व्यक्ती, भारतीय जवान, बँकेचे सभासद ग्राहक हितचिंतक, कर्मचारी, ठेवीदार, खातेदार पंचतत्वात विलीन झाले त्यांच्या पवित्र स्मृतिस भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर मा. अध्यक्ष सी.ए.श्री गोपाल अग्रवाल, उपाध्यक्ष श्री अनिल सोनी व मा. संचालक श्री अंकुश राऊत, श्री हेमंत ठक्कर, श्री जितेंद्र अग्रवाल, ॲड. श्री प्रविण लाहोटी, श्री सुभाष देविदान, श्री आनंद जिंदल, श्री मधुसुदन मुत्याल, श्री प्रदिप मुथा, सौ. मिनाक्षी दाड, सौ. उज्वला मिसाळ, सी.ए. श्री वरुण भक्कड, डॉ. श्री संजय राख, श्री विरेंद्र रुणवाल, श्री सागर कावना, श्री राहुल अग्रवाल, श्री राजेश कामड बँकेचे सन्माननीय सभासद श्री ओमसेठ मंत्री, श्री ज्ञानदेव पायगव्हाणे, श्री नरेश गुप्ता, श्री सीताराम लाला, श्री नरेंद्र मोदी, श्री सतिष बगडीया, श्री गोवर्धन अग्रवाल, श्री संजय मुथा, श्री सुनिल चौधरी, श्री मंजुसेठ भक्कड, ॲड. श्री सतिष तवरावाला, श्री काकासाहेब साबळे ई. सभासदांनी श्रीगणेश, लक्ष्मी, सरस्वती फोटोचे पुजन व माल्यार्पन करून दिप प्रज्वलीत केले, यानंतर सभेस सुरूवात झाली.

मा. अध्यक्ष सी.ए.श्री गोपालजी अग्रवाल यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. मनोगतात त्यांनी सन २०२४-२५ ची आर्थिक स्थिती सादर केली. ३१ मार्च अखेर बँकेच्या ठेवी रु.२४५.३० कोटी असुन कर्ज वाटप रु.१४८.२१ कोटी आहे. करपुर्वी ढोबळ नफा रु.३ कोटी ७२ लक्ष आहे. तर निव्वळ नफा रु.२ कोटी ५१ लक्ष प्राप्त केला. वैधानिक लेखा परिक्षणात बँकेने आपला अ वर्ग कायम ठेवला आहे. मार्च २०२५ अखेर छत्रपती संभाजीनगर येथे बँकेची नविन ११ वी शाखा कार्यान्वीत झाली. बँकेत क्रॅकींग सेवा, व्हाईस कॉलींग, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री स्वयंम रोजगार योजना, क्यु.आर कोड, व्हॉटसअप बँकींग ईत्यादी अत्याधुनिक सुविधा सुरू करण्यात आली. भविष्यात बँकिंग ऑन व्हील्स, बँक आपल्या दारी यामध्ये वरिष्ठ नागरीक ग्राहकांना बँकेच्या मिसकॉल सुविधेद्वारे त्यांना हवी असलेली सेवा घरपोच देण्याचे मानस आहे, असे बँकेचे अध्यक्ष यांनी सभासदांना माहती दिली. तसेच बँक स्वतःचा आय.एफ. एस.सी. कोड घेण्याचे धेय्य आहे. आर.बी.आय. डीजीटीलायजेशन व टेक्नॉलॉजिवर भर देत असल्याने बँक अत्याधुनीक तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे.

डॉ. श्री राजेश सेठीया यांचा बँकेचे सभासदांचे थायरॉईड चेकअप शिबीर करीता, श्री अभय करवा यांचा नेत्रदान सर्वश्रेष्ठ दान या जनजागृती करीता, श्री उदय शिंदे यांचा नदी खोली व रुंदीकरण या अभियानात विषेश सहभागा करीता, बँकेचे संचालक श्री सुभाष देवीदान यांचा रेल्वे संघर्ष समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल तसेच श्री ओमसेठ मंत्री, श्री संजय मुथा, श्री संजय दाड, श्री विजय कामड, श्री नरेंद्र मोदी, श्री ज्ञानदेव पायगव्हाणे, श्री राजेश कामड, श्री विजय राठी त्यांचे ही शाल श्रीफळ द्वारे स्वागत सत्कार करण्यात आले.

यावेळी उपस्थित श्री रमेश तोतला, श्री सुभाष वाघमारे, श्री राजकुमार दायमा, श्री सुनिल चौधरी, ॲड. श्री अनिल संचेती, श्री हितेंद्र शाह, श्री अशोक शर्मा, सीए श्री पियुष अग्रवाल, श्री सखाराम मिसाळ, श्री विजयकुमार दाड, श्री रविंद्र फुलभाटी, श्री कैलाश सोनी, श्री रमेश देविदान, श्री किशोर देविदान, श्री सुरेश रत्नपारखे, श्री पुरूषोत्तम गोयंका, सय्यद अख्तर, श्री सुनिल बियाणी, श्री साबळे, श्री अक्षय खत्ती, श्री ओमप्रकाश शिर्के, श्री विकास बागडी,

श्री संदिप धन्नावत, श्री संभाजीराव देशमुख, श्री सुर्यकांतराव पवार, श्री राजेंद्र जाधव, श्री अनिल पंच, श्री दिलीप अग्रवाल, श्री राजुसेठ भुतिया, श्री जगदीश अग्रवाल, श्री सतीष पंच, श्री पुरूषोत्तम गोयल, श्री अतुल राठी, श्री प्रविण शर्मा,




श्री दिगंबर पेरे, श्री राजेश पित्ती, श्री विजय बनवट, श्री ताराचंद मालपानी, श्री गीरीधर लधानी, श्री रतन पिपरैये, श्री धुराजी घारे, श्री राजाराम शहाणे, श्री अमित मिसाळ, मो. हनिफ मो. हुसेन, शेख बिलावर सय्यद अन्वर सय्यद नुर, श्री निवास पांगारकर, श्री मनोज जोशी, श्री अनिल ठक्कर, श्री प्रदिप तोतला, श्री सुशिल गौड, श्री अनुराग अग्रवाल, श्री महेश भक्कड, सी.ए. श्री निखिल बाहेती, श्री अरूण तापडीया, श्री नंदकिशोर बराजलावाला, श्री मोहन राठोड, श्री जयप्रकाश श्रीमाळी, श्री नबाब डांगे, श्री कांगणे सर, श्री निवृत्तीमहाराज पाचफुले, श्री मुरारीलाल गुप्ता, श्री दिनेश चौधरी, श्री गोविंद सराटे, श्री मुन्नासेठ गजबी, श्री राजेंद्र अग्रवाल, श्री दिनेश अग्रवाल ई. सभासद उपस्थित होते. खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या सभेचे आभार प्रदर्शन बँकेचे उपाध्यक्ष श्री अनिल सोनी यांनी केले. तर सुत्र संचालन बँके चे अधिकारी श्री राजेंद्र बजाज यांनी केले. याप्रसंगी बँकेचे महाव्यवस्थापक श्री राजेंद्र टोकशा, व प्र. व्यवस्थापक श्री आबासाहेब सोनवणे, अधिकारी श्री चंद्रकात दाभाडे तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते.

[illegible]